| | |
|---|---|
| NG001057 | PN004146 |

**TOTAL CANDIDATES : 2**

टिपा :-१) उपरोक्त निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उपरोक्त दोन उमेदवारांना त्यांनी त्यांच्या आवेदनपत्रात नमूद केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने मुलाखतीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अधीन राहून मुलाखतीस बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी अर्जात दावा केल्यानुसार सर्व मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर करणे अनिवार्य राहील. उमेदवार आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर करू शकला नाही तर मुलाखत घेतली जाणार नाही व मुदतवाढही दिली जाणार नाही. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे प्रमाणपत्रावरून आढळून आल्यास, तसेच अर्जातील दावे तपासणीत तो अपात्र आढळून आल्यास संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२) मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उपरोक्त दोन उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने लिंक ओपन झाल्यापासून तीन दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक आहे. केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहित धरला जाईल व तद्नंतर याबाबत उमेदवारांची कोणतीही निवेदने / पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

३) अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-अ व गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंतचा म्हणजेच दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल व संबंधित क्रीडा प्रमाणपत्र उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील. सदर अहवाल व क्रीडा प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास खेळाडू आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

४) मुलाखतीचा सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.